॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

1990
'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र. ०१**

जळगाव दि. ११ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायनशास्त्र प्रशाळेतील पाच विद्यार्थ्यांची निवड युपीएल प्रा.लि.कंपनीसाठी परिसर मुलाखतीद्वारे करण्यात आली.

प्रशाळेतील युपीएल प्रायेव्हेट लिमिटेड, अंकलेश्वर या उद्योग समूहात परिसर मुलाखतीतून कल्पेश पवार, हितेश महाले, गजानन ब्राम्हणे आणि दिक्षा पवार (पेस्टीसाईड ॲण्ड ॲग्रोकेमिकल्स ) यांची फॉर्म्युलेशन संशोधन अधिकारी तसेच गणेश पाटील (इंडस्ट्रियल केमिस्ट्री) यांची संशोधन व विकास अधिकारी म्हणून निवड करण्यात आली. प्रशाळेतील विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील, प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, संचालक प्रा.डी.एच.मोरे, ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंटचे समन्वयक प्रा.भूषण चौधरी तसेच पेस्टीसाईड ॲण्ड ॲग्रोकेमिकल्स विभागाचे प्रमुख प्रा.रत्नमाला बेंद्रे व प्रशाळेतील डॉ.डी.एस.दलाल, डॉ.व्ही.व्ही.गिते, ए.एम.पाटील यांनी अभिनंदन केले.

---

**बातमी क्र. ०२**

जळगाव दि.११ ( ) महाविद्यालय व प्रशाळांमध्ये ई-सुविधा योजनेतंर्गत पदवी व पदव्युत्तर स्तरावरील प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने कशी पार पाडावी यासंदर्भात मंगळवार दि.११ जून रोजी विद्यापीठात जळगाव जिल्हयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी कार्यशाळा घेण्यात आली.

विद्यापीठ व एमकेसीएल यांच्यात सामंजस्य करार झालेला असून विद्यार्थी व महाविद्यालयांच्या सोयीसाठी ई-सुविधा योजना उपलब्ध करुन देण्यात आली आहे. महाविद्यालयीन स्तरावर सॉफ्टवेअरद्वारे डिजिटल कॉलेज व डिजिटल युनिर्व्हसिटी ही संकल्पना राबविण्यात येत आहे. पदवी व पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया कशी पार पाडावी, पात्रता विषयक कामकाज कसे हाताळावे, पदवी स्तरावरील वैयक्तिक माहिती कशा पध्दतीने अद्ययावत करावी याची माहिती कार्यशाळेत देण्यात आली. या कार्यशाळेत परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी मंचावर उपकुलसचिव फुलचंद अग्रवाल, डॉ.आर.पी.पाटील, पध्दती विश्लेषक कपिल गिरी, संपर्क अधिकारी मनोज निळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अमोल पाटील यांनी केले.

---

जा.क्र: कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : ११ जून, २०१९

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी